अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# रुग्णालयांच्या बेबंदपणाला आळा घालणारा कायदा

आजच्या बदलत्या आणि धावपळीच्या जीवनशैलीमध्ये प्रत्येक नागरिकाला आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी लागते. आजचे ताणतणाव, स्पर्धा एवढे वाढले आहेत की एकूणच वेगवेगळ्या प्रकारच्या आजारांची संख्या वाढते आहे. गेल्या दहा वर्षाचा सहजपणे किंवा अगदी वरवर जरी आढावा घेतला तरी रुग्णांच्या संख्येत तब्बल दहापट वाढ झाल्याचे पहायला मिळते. ही संख्या वाढत असल्यामुळेच आज पंचतारांकित हॉस्पिटलचा धंदा प्रचंड तेजीत सुरू आहे. एवढेच नाही तर अगदी छोटे छोटे क्लिनीक्स पॅथॅलॉजी, लॅबोरेटरीजमध्ये रुग्णांची प्रचंड संख्या पहायला मिळते. आणि त्याचवेळेला रुग्णांबाबत होणारा हलगर्जीपणाही वाढलेला दिसतो. एखादा बकरा सापडावा या भावनेने रुग्णाला किंवा त्याच्या नातेवाईकांना वागणूक दिली जाते, वाटेल तशी फी घेतली जाते. थोडक्यात सांगायचे तर रुग्णालये, दवाखाने किंवा वेगवेगळे क्लिनीक्स आणि पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरीवर आज कोणतेही थेट सरकारी नियंत्रण नाही केवळ त्या सुरू करण्यासाठी परवानग्या मिळवणे त्यासाठी लागणारे कर भरणे एवढाच सरकारचा आणि डॉक्टर रुग्णालय पॅथलॅब यांचा संबंध येतो. परंतु जिथे प्रत्यक्ष लोकांचा शरीराचा आजार बरा करण्याशी किंवा एकूण मनुष्याच्या आयुष्याशी जगण्याशी थेट संबंध येतो त्या रुग्णालयांवर डॉक्टरांवर क्लिनीक्स किंवा पॅथलॅबवर कायद्याचे कोणतेच नियंत्रण राहू नये हे धक्कादायकच ठरते. या विरोधात आता देशभरच चर्चा सुरू झाली आहे. वैद्यकीय किंवा रुग्ण उपचार ही आता केवळ सेवा राहिलेली नाही तो कॉर्पोरेट पध्दतीचा व्यवसाय झाला आहे. रुग्णाकडे एक माणूस म्हणून बघण्याऐवजी चक्क एक ग्राहक म्हणूनच बधितले जाते. अशा परिस्थितीत त्या रुग्णाकडून वसूल केली जाणारी फी आणि त्या बदलात मिळणारी सुविधा किंवा वागणूक यामध्ये देखील खूप मोठे अंतर पडू लागले आहे. वैद्यकीय उपचाराबरोबर रुग्णांची होणारी लुबाडणूक फसवणूक याबाबतही मोठ्या प्रमाणावर तक्रारी येऊ लागल्या आहेत त्यावरचा उपाय म्हणून आणि रुग्णाच्याही हक्काचे संरक्षण व्हावे म्हणून महाराष्ट्र विशेष वैद्यकीय आस्थापना कायदा आणला जात आहे. त्याबाबतची माहिती सरकारने वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे. या कायद्यातल्या महत्त्वाच्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक दवाखाना, लॅबोरेटरीजचा आवार कसा स्वच्छ असावा इथपासून वेगवेगळ्या उपचारांसाठी शक्यतो सगळीकडे समान फी आकारली जावी यावर भर दिला गेला आहे. आज जवळपास सर्वच रुग्णालयात किंवा अगदी साध्या साध्या लॅबमध्येसुध्दा रुग्णांना सोयीसुविधांचे तर सोडाच परंतु चांगली वागणूकही मिळत नाही. त्यांच्या गरजेचा गैरफायदा घेऊन त्रास देण्याचे प्रकार घडत असतात.त्याला काही प्रमाणात तरी आळा बसण्याची गरज आहे.

## आदर, प्रतिष्ठा संपली

असा प्रकार क्लिनीकल एस्टाब्लिशमेंट ॲक्ट मणिपूर, मिझोरम या राज्यांमध्ये लागू झालेला आहे. खरे तर सगळ्या देशासाठी तो समान पध्दतीने लागू करता येईल का याचा विचार झाला पाहिजे. आज समाजातल्या जवळपास सर्व क्षेत्रांना कायद्याचे काहीना काही प्रमाणात बंधन आहे, ग्राहक कायद्यामुळे सामान्य माणूस न्याय मागू शकतो. परंतु अजूनही समाजात असे काही व्यवसाय आहेत की जिथे त्यांनी ग्राहकाकडून किती शुल्क किती किंमत वसूल करावी याचे कोणतेच बंधन नाही.वकिली आर्किटेक्चर, बिल्डर, डॉक्टर, खाजगी बससेवा अशा काही सेवा खरे तर व्यवसाय आहेत की खऱ्या अर्थाने ग्राहकांच्या हिताचा त्यांच्या हक्कांचा विचार करीत नाहीत. केवळ मनाप्रमाणे शुल्क किंवा फी वसूल केली जाते. मात्र त्याच्या मोबदल्यात ज्या सुविधा किंवा योग्य ती काळजी घेतली जायला हवी ती या व्यवसाय करणाऱ्यांकडून घेतली जात नाही. ज्यावेळी एखादा मनुष्य आपल्या खिशातून आपल्या कष्टाचा पैसा मोजून देत असतो. तेव्हा त्याला त्या सेवा तितक्याच जाणिवेने चांगल्या पध्दतीने मिळाल्या पाहिजेत. तो त्या व्यक्तिचा हक्क आणि अधिकार ठरतो. तो त्यांना बजावता आला पाहिजे. प्रामुख्याने सर्वात वाईट अवस्था रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांची असते. कितीही पैसेवाला रुग्ण असो. त्याच्याकडून ज्या प्रमाणात पैसा घेतला जातो त्याप्रमाणात तशा प्रकारची सुविधा दिली जात नाही. श्रीमंतांना मोठमोठ्या रुग्णालयातून दिली जाणारी वागणूक की, त्याच्याकडे कसा आणि किती पैसा आहे यावर तर सामान्य मध्यमवर्गीयांकडे किती रकमेची मेडिक्लेम पॉलिसी आहे. यावर आधारित वागणूक मिळत असते. गरिबाला तर पंचतारांकित रुग्णालयात पायसुध्दा ठेवता येत नाही. कितीही कायदे केले तरी हे प्रकार होतीलच परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांना जो मानसिक आणि नैतिक आधार हवा असतो तो देण्याचे काम जरी या कायद्याने झाले तरी पुष्कळ झाले असे म्हणता येईल.

## नैतिकता शिल्लक नाही

काळाचा महिमा किती विचित्र आहे पहा, एकेकाळी वैद्यकीय सेवा ही ईश्वरी सेवा मानली जात असे. वेळ पडली तर स्वत:च्या पदरचे पैसे खर्च करून रुग्णाला वाचवण्यासाठी डॉक्टर मंडळी शर्थ करीत असत. पदरचे पैसे जरी खर्च करावे लागले नाहीत तरी एखादा रुग्ण गरीब असेल किंवा अनेक प्रकारचे उपचार करूनही तो वाचला नाही तर त्याच्याकडून पैसे न घेण्याचा उदारपणा त्यावेळचे वैद्य किंवा डॉक्टर दाखवित असत. त्यांचा उदारपणा केवळ माणुसकी आणि नैतिकतेच्या बळावर उभा असे. स्वत:चा बडेजावपणा किंवा उपकाराच्या भावनेतून केला जात असे. तोच भाग फॅमिली डॉक्टर या संकल्पनेत होता.सगळ्या कुटुंबाला आधार वाटावा अशा प्रकारचा व्यवहार फॅमिली डॉक्टरकडून होत असे. आता या सगळ्या गोष्टी अगदी इतिहासजमा झाल्या आहेत. पैसा हेच सर्वस्व झाल्याने वैद्यकीय व्यवसायाची प्रतिष्ठा आदर शिल्लक राहिला नाही. डॉक्टर किंवा रुग्णालय चालवणाऱ्यांकडून तशी आपुलकीची वागणूक मिळत नाही. माणुसकी जपली जात नाही त्याचवेळी संतप्त झालेले रुग्णांचे नातेवाईक डॉक्टरांवर हात टाकतात. किंवा रुग्णालय व्यवस्थापनाला धडा शिकवता. आता या व्यवसायात नीतीमत्ता उरली नसल्याने कायद्याचा बडगा दाखवून डॉक्टर आणि रुग्णालय चालवणाऱ्या धंदेवाईक लोकांना वठणीवर आणण्याचा प्रयत्न होत आहे. नेहमीप्रमाणे या कायद्याविरुद्ध सगळ्या डॉक्टरांनी विरोध करायला सुरुवात केली आहे. अनेक प्रकारचे मुद्दे उकरून हा कायदा होऊ नये असे प्रयत्न होत आहेत. परंतु आता सरकारने मूठभर डॉक्टरांचा विचार न करता कोट्यवधी जनतेचा विचार करावा आजच्या धावपळीच्या जीवनात प्रकृतीशी सामना करणाऱ्या नागरिकाला डॉक्टरांनी रुग्णालय व्यवस्थापनाने योग्य ती वागणूक दिली पाहिजे. रुग्ण म्हणजे पैसे ओरबाडण्याचे माध्यम असा कसाईपणा न दाखवता माणुसकी जपण्याचा प्रयत्न करावा कायद्यामुळे भरकटत जाणारा आणि आपली प्रतिष्ठा आदर घालवणारा वैद्यकीय व्यवसाय थोडातरी वळणावर येईल अन्यथा अन्य क्षेत्राप्रमाणे सामान्य जनता जर योग्य न्याय मिळाला नाही या व्यवसायाविरुद्ध उभी राहिल. हे त्यांनी लक्षात घ्यावे.